जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,

# मारुतरावजी घुले पाटील कला वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर.

दि. 22.02.2022

## इतिहास विभाग

## विद्यार्थी सूचना

Marutraoji Ghule Patil Arts, Commerce & Science College Ahmednagar

**T.Y.B.A. प्रकल्प कार्य व मौखिक परीक्षा**

महाविद्यालयातील तृतीय वर्ष टी.वाय.बी.ए. इतिहास विषय स्तर विषय असणाऱ्या विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, Applied History S-3 (उपयोजित इतिहास) सेमिस्टर-6 या विषयाच्या मूल्यमापनात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अभ्यासक्रमास महाविद्यालयाकडे प्रकल्प कार्य (प्रोजेक्ट) साठी 20 गुण व तोंडी परीक्षेसाठी 10 गुण दिलेले आहे असे एकूण 30 गुणाचे मूल्यमापन आहे. तरी अंतिम वर्ष इतिहास विषय स्पेशल असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपण दिलेल्या शैक्षणिक क्षेत्र भेट (फीड व्हिजिट) यावर प्रकल्प कार्य (प्रोजेक्ट) पूर्ण करून इतिहास विभागात दिनांक- 11.03.2022 जमा करणे अनिवार्य आहे याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

Department of History
Marutraoji Ghule Patil Arts, Commerce
& Science College, Ahmednagar

प्राचार्य
प्राचार्य
मारुतरावजी घुले पाटील
कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय
नागापुर, अहमदनगर

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, वडगाव-गुप्ता, संचालित

मारूतरावजी घुले पाटील

कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय

नागापूर, अहमदनगर ४१४१११ फोन :(०२४१) २७७९१८१

Website : www.mgpcollege.org.in E-mail : mgpcollege@gmail.com, CAAA017120@unipune.ac.in

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

बी.ए. इतिहास पदवीच्या आंशिक पुर्ततेसाठी सादर केलेला प्रकल्प अहवाल

# "भुलेश्वर मंदीर माळशिरसः एक ऐतिहासिक अभ्यास"

संशोधक

कांबळे समिक्षा दत्तात्रय

मार्गदर्शक

प्रा.एस.व्ही.मरकड,

विभाग प्रमुख, इतिहास विभाग,

मारूतरावजी घुले पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर

सन–2021–22

**सवित्रीबाई फुले पुणे विद्यापाठाच्या बी.ए. इतिहास**

**पदवीच्या अंशिक पुर्ततेसाठी सादर केलेला**

**इतिहास संशोधन प्रकल्प अहवाल**

"भुलेश्वर मंदीर माळशिरस : एक ऐतिहासिक अभ्यास"

| | |
|---|---|
| संशोधकाचे नाव– | कांबळे समिक्षा दत्तात्रय |
| वर्ग – | तृतीय वर्ष कला |
| विषय– | इतिहास विशेषस्तर 3 |
| संशोधन समस्या शीर्षक– | "भुलेश्वर मंदीर माळशिरस : एक ऐतिहासिक अभ्यास" |
| रोळ न.– | 07 |
| विद्यापीठ परीक्षा बैंठक | |

उपरोक्त विद्यार्थ्याने इतिहास विशेष स्तर 3 या विषयाच्या संशोधन प्रकल्प कार्य प्रतिपुर्ततेसाठी सादर केलेला प्रस्तुत संशोधन प्रकल्प हा समाधान कारक आहे/नाही. त्यांनी प्रस्तुत प्रकल्पासाठी एतिहासिक संशोधन पद्धतीचा सुयोग्य वापर केला असुन त्या स.ब.धी मौखिक चाचणीत विषयासंबंधी समाधान कारक महिती सादर केळी आहे/नाही.

दि. 17 / 07 /2022 स्थळ– अहमदनगर

17.7.22
मार्गदर्शक

बाहयपरीक्षक

प्राचार्य

प्रा. मरकड एस.व्ही.
Head of Dept. History
Marutraoji Ghule Patil
Arts, Commerce & Science College
Ahmednagar

डॉ.ए.के.पंदरकर
PRINCIPAL
Marutraoji Ghule Patil Arts,
Commerce & Science College
Nagapur, Ahmednagar
College Code-893

# प्रतिज्ञापत्र

मी कांबळे समिक्षा दत्तात्रय प्रतिज्ञापुर्वक घोषित करते की ''भुलेश्वर मंदीर माळशिरसः एक ऐतिहासिक अभ्यास'' या विषयावरील संशोधन प्रकल्प अहवाल माझे मार्गदर्शक प्रा. मरकड एस.व्ही. यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या प्रत्यक्ष कार्यावर आधरित आहे. या संशोधनासाठी प्रस्तुत प्रकल्पासाठी एतिहसिक संशोधन पद्धतीचा सुयोग्य वापर केला असुन ऐतिहसिक संशोधनाची सर्वेक्षण पद्धतीचा वापर प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेला असून सदर संशोधनासाठी वापरलेल्या संदर्भ सहित्याचा निर्देश संदर्भ सुची मध्ये केलेला आहे.

संशोधक

ठिकाण – अहमदनगर

नाव– कांबळे समिक्षा दत्तात्रय

S.D. Kamble

# अनुक्रमणिका

| अ. क्र | शीर्षक |
| --- | --- |
| 1 | मुखपृष्ठ |
| 2 | इतिहास संशोधन प्रकल्प अहवाल |
| 3 | प्रतिज्ञापत्र |
| 4 | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र |
| 5 | ऋणनिर्देश |
| 6 | अनुक्रमणिका |
| 7 | भुलेश्वर मंदीर माळशिरस एक ऐतिहासिक अभ्यास |
| 8 | मंदिरातील शिल्पाचे फोटो |
| 9 | मंदिराचा गाभारा |
| 10 | दौलतमंगळ किल्ला आणि मंदिराचा जीर्णोद्धार |
| 11 | पुरातन मंदिर |
| 12 | संदर्भ सुची |
| 13 | ऐतिहासिक स्थळाला भेट |

## मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कांबळे समिक्षा दत्तात्रय, वर्ग टी.वाय. बी.ए. इतिहास यांनी हा संशोधन प्रकल्प ''भुलेश्वर मंदीर माळशिरस : एक ऐतिहासिक अभ्यास'' हा माझ्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केला आहे त्यांनी. प्रस्तुत संशोधन हे ऐतिहासिक संशोधन असुन या करिता वापरण्यात संशोधन पद्धती व महिती मिळवण्यासाठी वापरलेल्या संदर्भ स्त्रोताचा योग्य निर्देश या अहवालात करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन कार्य समाधानकारक आहे.

मार्गदर्शक

ठिकाण – अहमदनगर

प्रा. मरकड एस.व्ही.

## ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनासाठी मला ज्या अनेक व्यक्तिचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले त्याचा बद्ल्यात मी कृतज्ञता व्यक्त करतो . माझे मार्गदर्शक प्रा. मरकड एस.व्ही. तसेच प्राचार्य. डॉ.ए.के.पंदरकर यांनी मला संशोधन करण्यास प्रोत्साहन दिल्याबद्दल व संशोधनाच्या दृष्टीने सर्वोपरी मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे .

सर्वात महत्वाचे म्हणजे संशोधनासाठी आवश्यक असलेली महिती उपळब्ध करुन दिल्याबद्दल मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालयाचे ग्रंथपाल, विविध ग्रंथालये व संस्थांचे प्रमुख व कर्मचारी यांचा मी ऋणी आहे. तसेच संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती गोळा करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती गोळा करण्याच्या बाबतीत सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल मी प्रा.के.आर. पिसाळ व प्रा.एम.एल.कराळे यांची ऋणी आहे संशोधकीय प्रकल्प अहवाळाची संगणकीय अक्षर जुळणी करुन देण्यासाठी प्रा. दहातोंडे यांनी सहकार्य केले त्या बद्दल मी त्यांची ऋणी आहे. याशिवाय अनेक ज्ञात–अज्ञात व्यक्तिचे संशोधन कार्य पुर्ण करतांना मला जे सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांची मी ऋणी आहे.

ठिकाण – अहमदनगर

संशोधक

कांबळे समिक्षा दत्तात्रय

S.D. Kamble

# ऐतिहासिक वास्तूंचे फोटो



भुलेश्वर मंदिर, माळशिरस



महादेव पिंड

# भुलेश्वर मंदिर, माळशिरस

**भुलेश्वर** हे पुण्याजवळील प्राचीन मंदिर असलेले ऐतिहासिक ठिकाण आहे. हे ठिकाण महादेवाच्या पांडवकालीन मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. मूलतः हे ठिकाण "मंगलगड" असे होते. तेराव्या शतकात देवगिरीकर यादवांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रात अनेक हेमाडपंती मंदिरे निर्माण करण्यात आली. याच शतकाच्या मध्यास भुलेश्वर मंदिराचे बांधकाम झाले असावे. सिंहगडावरून निघालेल्या सह्याद्रीच्या रांगेत माळशिरस गावाच्या उत्तरेस व यवतच्या नैऋत्येस ७०० फूट उंचीवर मध्यास भुलेश्वर मंदिर आहे. मंदिराच्या भिंतीवरील शिल्पात कोरीवकाम व मूर्तिकाम अद्वितीय आहे. लढाईच्या काळात बऱ्याच मूर्तींची तोडफ़ोड करण्यात आली. या मंदिरात स्त्री रूपातील गणपतीची मूर्ती आहे. गाभाऱ्यात शिवलिंग आहे. मात्र फ़क्त पूजेसाठीच ते पिंडीवर ठेवण्यात येते. मंदिराच्या आत छायाचित्रणास बंदी आहे. महाशिवरात्रीला येथे गर्दी होते.पुरंदर तालुक्यातील माळशिरस गावातून श्रावण महिन्यात येथे भुलेश्वराची पालखी नेली जाते. दर सोमवारी यात्रा भरते. ही जुनी परंरपरा आहे.या मंदिराविषयी अनेक दंतकथा सांगितल्या जातात. परंतु पत्रकार कवी दशरथ यादव यांनी संशोधन करून यादवकालीन भुलेश्वर हे एतिहासिक संशोधनपर पुस्तक लिहिले आहे.हे एकमेव पुस्तक असून, महिमा भुलेश्वराचा गाण्याचा अल्बमही त्यांनी काढला आहे. शहाजीराजे यांच्या सुपे परगण्यातील हे ठिकाण असून राजामाता जिजाऊ बालशिवबाला घेऊन येत असत.सुरुवातीला हा गड निजामाचा सरदार मुरारजोगदेव याच्याकडे होता. पुणे जाळल्यावर प्रांताचा कारभार मामले दॅालत मंगळ भुलेश्वर येथून होत होता.

## मंदिराची रचना


अर्धखुला मंडप, अंतराळ आणि गर्भगृह असा या मंदिराचा तलविन्यास आहे. या मंदिरासमोर नंदीमंडपही आहे. गर्भगृहाच्या बाह्यभिंतीवर पाच देवकोष्ठे तर अंतराळाच्या बाह्यभिंतीवर दोन देवकोष्ठे आहेत. अर्धखुल्या मंडपाच्या खालच्या थरावर सिंह आणि हत्ती तर वरच्या थरावर पुराणकथांमधील दृश्ये कोरलेली आहेत. मंदिराच्या आवाराभोवती असलेल्या भिंतीला सोळा देवकुलिका आहेत.

## मंदिराची शैली

या मंदिराची वास्तुशैली दक्षिणेकडील होयसळ मंदिराप्रमाणे आयताकृती व पाकळयासदृश आहे. इतर हेमाडपंती मंदिरांच्या तुलनेत या मंदिरातील शिल्परचना अधिक उच्च प्रतीची आहे. पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिरांच्या बाहेरील प्राकाराची रचना उत्तरेतील जैन मंदिरांच्या धर्तीवर आहे. येथील शिवमंदिरास भुलेश्वर-महादेव किंवा यवतेश्वर म्हणतात.पुरंदर तालुक्यातील माळशिरस गावाजवळील हे मंदिर यादवकाळात बांधले आहे. मंदिराची मूळ बांधणी १३व्या शतकातील असून सभोवतालची भिंत, नगारखाना व शिखरे १८व्या शतकातील मराठा शैलीतील आहेत. पूर्वी मूळ मंदिरास अतिभव्य प्राकार होता व नंदीचा मंडप स्वतंत्र होता. १८व्या शतकात झालेल्या जीर्णोद्धारानंतर हे मंदिर एकाच छताखाली आले.

# मंदिरातील शिल्पांचे फोटो









## मंदिराचा गाभारा

या मंदिराचे गर्भगृह खोल असून गर्भगृहासमोर उंचावर काळ्या दगडातील कोरीव काम केलेला नंदी आहे. नंदीच्या उजव्या बाजूस एक ओटा असून त्यावर कासवावर बसलेला नंदी असावा. हल्ली त्याचे फक्त डोके शिल्लक असल्यामुळे हा प्राणी निश्चित कोणता असावा हे कळत नाही. गर्भगृहातील शिवलिंगाच्या संगमरवरी बाणावर पितळी मुखवटा बसवलेला आहे. बाण काढल्यानंतर खाली आत तीन मुख्य लिंगे, तीन कोपऱ्यात उंचवट्याच्या स्वरूपात असून ती ब्रह्मा, विष्णू व महेश यांची प्रतीके आहेत. पिंडीच्या खाली असलेल्या खोलगट भागात नैसर्गिकरीत्या पाणी पाझरत असते. अन्य शिवमंदिरापेक्षा येथे अनेक वैशिष्ट्ये आढळतात. कीर्तिमुखे, उंबरठ्यांच्या मध्यभागी न काढता दोन्ही अंगास कोरलेली आहेत. गाभाऱ्याच्या गणेशपट्टीवर गणपतीचे चित्र असले तरी देवळाभोवती असणाऱ्या दक्षिणभिमुख पट्ट्यांवर गणेशाऐवजी भैरवाचे शिल्प कोरलेले आहे. ओवऱ्या व दगडात कोरलेल्या खिडक्या यांची एकाआड एक मांडणी केलेली आहे.

## मंदिरातील शिल्पे

या मंदिरात मोठ्या प्रमाणात मानवी व देवतांची शिल्पे आहेत. देवळाभोवती असलेल्या ओवऱ्यांमध्ये अनेक देवतांच्या मूर्ती असून काही ओवऱ्या रिकाम्या आहेत. मुख्य सभामंडपांच्या भोवती असलेल्या अर्ध भिंतींवर युद्धप्रसंग, सिंह, हत्ती इत्यादी प्राणी व रामायण-महाभारतातील प्रसंग कोरलेले आहेत. महाभारतातील प्रसंग भारतातील इतर मंदिरांपेक्षा येथे जास्त ठसठशीत व रेखीव आहेत. द्रौपदी-स्वयंवर, शरपंजरी भीष्म, हत्तीला आकाशात फेकणारा भीम ही कथाशिल्पे अधिक जिवंत वाटतात. मातृकादेवी, गणपती, विष्णूंचे अवतार, योद्धे, पक्षी इत्यादी विविध प्रकारचे शिल्पांकन मंदिरात आढळते.

कुंभ, कमळ कीर्तिमुख, मकर, पाने-फळे, वेलबुट्ट्या ही शुभचिन्हे मंदिराच्या सुशोभनात वापरलेली आहेत. येथील दर्पणधारी स्त्रीमूर्ती शिल्पकलेचा सुंदर नमुना आहे. दक्षिण दरवाज्यावर असलेल्या भरत-शत्रुघ्नाच्या डाव्या बाजूस दोन चौघडावाले उंट दाखवलेले आहेत. दक्षिणेकडील मंदिरात उंटाचे शिल्प क्वचितच आढळते. माळव्यात प्रचलित असलेल्या भूमिज उपशैलीचा प्रभाव येथील काही शिल्पांवर ठळकरीत्या आढळतो. यादव साम्राज्याची इतिश्री झाल्यानंतर यवनांकडून महाराष्ट्रातील अनेक मंदिरांची, शिल्पांची नासधूस करण्यात आली. भुलेश्वर मंदिरातील शिल्पांचेही या काळात अतोनात नुकसान झाले. (युद्ध आणि परकीय आक्रमण) इतके असूनही या मंदिरातील शिल्लक राहिलेल्या शिल्पांमुळे येथील सौंदर्य अद्यापि टिकून आहे.

मंदिराच्या गाभाऱ्याच्या बाहेरील बाजूस वर तीन सप्तमातृकांच्या समूहात गणेशाचे स्त्रीस्वरूपातले दुर्मीळ शिल्प आहे. वेरूळच्या कैलास लेण्यात या प्रकारचे शिल्प आढळते. प्राचीन वाङ्मयात व स्कंदपुराणाच्या काशीखंडात चौसष्ट योगिनींच्या यादीत या गणेशाचा 'वैनायकी' असा केलेला आढळतो. देवीसहस्रनामांत या देवतेस 'विनायकी, लंबोदरी, गणेश्वरी' अशा विशेषणांनी संबोधले आहे. 'शिल्परत्न' या ग्रंथात वैनायकीचा उल्लेख 'शक्तिगणपती' असा केलेला आहे. गुप्तकाळात प्रथम सप्तमातृका शिल्पाचा उगम झाला. मध्ययुगात शक्तिपूजक संप्रदायात वैनायकी पूजनाचे महत्त्व वाढले. वैनायकी शिल्पे गजमुख, चतुर्भुज आणि गणपतीप्रमाणे आयुधे धारण केलेली आढळतात. भुलेश्वर येथील वैनायकी शिल्पे पद्मासनात बसलेली असून सालंकृत आहेत. खाली मूषक हे वाहन आहे. येथे वेरूळच्या लेण्याप्रमाणे पूर्ण शिल्पपट्टिका नसून तीन सप्तमातृकांच्या शिल्पपट्टीत वैनायकीची शिल्पे आहेत.

## दौलतमंगल किल्ला आणि मंदिरांचा जीर्णोद्धार

१६३४मध्ये विजापूरचा सरदार मुरार जगदेव याने या डोंगरावर 'दौलत मंगळ' नावाचा किल्ला मांडला. (शिवचरित्र प्रदीप – १९२५) या किल्ल्याचा भग्न बुरूज अद्यापही देवळाकडे जाताना उजव्या बाजूस दृष्टीस पडतो. पहिले बाजीराव पेशवे व सातारचे शाहू छत्रपती यांचे गुरू ब्रह्मेंद्रस्वामी यांनी अनेक हेमाडपंथी मंदिरांचा जीर्णोद्धार केला. १७३७मध्ये स्वामींनी एक लाख रुपये खर्चून तीन कमानींचा नगारखाना, सभामंडप व तीन चुनेगच्ची शिखरे बांधली. हे बांधकाम संभाजी व व्यंकोजी नाईक या गवंड्यांनी केले. देवळाच्या बांधकामात स्वामी जातीने लक्ष पुरवित असत. दमाजी गायकवाड या सरदाराने पवारांवर मिळविलेल्या विजयाप्रीत्यर्थ जीर्णोद्धारास पंचवीस हजार रुपये दिले. वसईच्या विजयानंतर चिमाजी अप्पांनी भुलेश्वरास मुकुटाकरिता १२५ रुपये व सव्वाशे सोन्याच्या पुतळ्या अर्पण केल्याची नोंद ऐतिहासिक साधनांमध्ये आहे. ब्रह्मेंद्रस्वामींनी माळशिरस व यवतमध्ये विहिरी व तळी बांधून दिली. येथील जीर्णोद्धारामुळे हे मंदिर हेमाडपंथी-मराठा समिश्र वास्तुशैलीचे झालेले आहे.

भुलेश्वर मंदिरातील शिल्पे, शिल्पसौंदर्याचा उत्तम आविष्कार आहेत. पुरातत्त्वखात्याने हे मंदिर राष्ट्रीय संरक्षित स्थळ म्हणून घोषित केलेले आहे.

## कसे जाल

पुण्यापासून अंदाजे ५० कि.मी. अंतरावर हे ठिकाण आहे. पुण्यातील स्वारगेट बसस्थानकावरून निघून यवत बसस्थानकापर्यंत बस जाते. तेथून पुढे सहा आसनी रिक्षेने भुलेश्वर मंदिरापर्यंत जाता येते. तसेच यवत सासवड ही बस ही यवत वरून भुलेश्वर मार्गे सासवडला जाते






ऐतिहासिक स्थळाला भेट

## ❖संदर्भ सूची

1.प्रत्यक्ष पहाणी व क्षेत्रभेट

2. संबंधितांच्या मुलाखती

3. इतिहास म्हणजे काय?– प्रा. इ.एच.कार

4 इतिहासाची तोंडओळख– प्रा. अरूणा ढेरे, प्रा.राजेंद्र भामरे

5. इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान– शांता कोठेकर

6) इतिहासलेखनशास्त्राचा परिचय - प्रा. ज्योती राऊत.

7) उपेक्षित इतिहास. - कल्याण चव्हाण.

[signature]

17.7.22

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालय, अहमदनगर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

बी.ए. इतिहास पदवीच्या आंशिक पुर्ततेसाठी सादर केलेला प्रकल्प अहवाल

# खोपेश्वर शिवकालीन मंदीर विळद: ऐतिहासिक अभ्यास


संशोधक

किर्ती भरत सोनवणे

मार्गदर्शक

**प्रा.एस.व्ही.मरकड**

विभाग प्रमुख, इतिहास विभाग,

एम.जी.पी.कॉलेज,अहमदनगर


संशोधन केंद्र

इतिहास विभाग,

एम.जी.पी.कॉलेज,अहमदनगर

सन

२०२१-२०२२

**सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठाच्या बी.ए. इतिहास**

**पदवीच्या अंशिक पुर्ततेसाठी सादर केलेला**

**इतिहास संशोधन प्रकल्प अहवाल**

**"खोपेश्वर शिवकाली मंदीर विळद ऐतिहासिक अभ्यास"**

| | |
|---|---|
| संशोधकाचे नाव | किर्ती भरत सोनवणे |
| वर्ग | तृतीय वर्ष कला |
| विषय | इतिहास विशेषस्तर ३ |
| संशोधन समस्या शिर्षक | खोपेश्वर शिवकालीन मंदीर विळद ऐतिहासिक अभ्यास |
| रोल नं | ८ |
| विदयापीठ परीक्षा बैठक | |

उपरोक्त विदयार्थ्याने इतिहास विशेष स्तर ३ या विषयाच्या संशोधन प्रकल्प कार्य प्रतिपुर्ततेसाठी सादर केलेला प्रस्तुत संशोधन प्रकल्प हा समाधान कारक आहे / नाही. त्यांनी प्रस्तुत प्रकल्पासाठी एतिहासिक संशोधन पद्धतीचा सुयोग्य वापर केला असुन त्या संबंधी मौखिक चाचणीत विषयासंबंधी समाधान माहिती सादर केली आहे / नाही.

**दि.** 17 / 7 / २०22 **स्थळ** - अहमदनगर

**मार्गदर्शक** **बाह्यपरीक्षक** **प्राचार्य**

प्रा. मरकड एस.व्ही.

Head of Dept. History
Marutraoji Ghule Patil
Arts, Commerce & Science College
Ahmednagar

PRINCIPAL
Marutraoji Ghule Patil Arts,
Commerce & Science College
Nagapur, Ahmednagar
College Code-893

# प्रतिज्ञापत्र

मी “किर्ती भरत सोनवणे” प्रतिज्ञापुर्वक घोषित करते की खोपेश्वर शिवकालीन मंदीर विळदः ऐतिहासिक अभ्यास या विषयावरील संशोधन प्रकल्प अहवाल माझे मार्गदर्शक प्रा. मरकड एस.व्ही. यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या प्रत्यक्ष कार्यावर आधारित आहे. या संशोधनासाठी प्रस्तुत प्रकल्पासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा सुयोग्य वापर केला असुन ऐतिहासिक संशोधनाची सर्वेक्षण पद्धतीचा वापर प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेला असुन सदर संशोधनासाठी वापरलेल्या संदर्भ साहित्याचा निर्देश संदर्भ सुची मध्ये केलेला आहे.

K.B.Sonawane

**संशोधक**

**ठिकाण** : अहमदनगर

नांव - किर्ती भरत सोनवणे

## मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, किर्ती भरत सोनवणे वर्ग टी.वाय.बी.ए. इतिहास यांनी हा संशोधन प्रकल्प खोपेश्वर शिवकालीन मंदीर विळद ऐतिहासिक अभ्यास हा माझ्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केला आहे त्यांनी प्रस्तुत संशोधन हे ऐतिहासिक संशोधन असुन या करिता वापरण्यात संशोधन पद्धती व माहिती मिळवण्यासाठी वापरलेल्या संदर्भ स्त्रोताचा योग्य निर्देश या अहवालात करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन कार्य समाधानकारक आहे.

**ठिकाण** - अहमदनगर

**मार्गदर्शक**

प्रा. मरकड एस.व्ही.

## ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनासाठी मला ज्या अनेक व्यक्तिंचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले त्याचा बदल्यात मी कृतज्ञता व्यक्त करतो. माझे मार्गदर्शक प्रा. मरकड एस.व्ही. तसेच प्राचार्य. डॉ. टि.एम.वराट यांनी मला संशोधन करण्यास प्रोत्साहान दिल्याबद्दल व संशोधनाच्या दृष्टीने सर्वोपरी मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिल्याबद्दल मारुतरावजी घुले पाटील महाविदयालयाचे ग्रंथपाल, विविध ग्रंथालये व संस्थाचे प्रमुख व कर्मचारी यांचा मी ऋणी आहे. तसेच संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती गोळा करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती गोळा करण्याच्या बाबतीत सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल पुजारी लहानु होडगर, रभाजी सुळ सरपंच, रभाजी सुळ पुजारी, दिनेश घोरपडे, आशिर्वाद नेट कॅफे, शहाजी नाना कांरडे, प्रा. सोनवणे मॅडम यांचा मी ऋणी आहे. संशोधकीय प्रकल्प अहवालाची संगणकीय अक्षर जुळणी करुन देण्यासाठी प्रा. दहातोंडे यांनी सहकार्य केले त्या बद्दल मी त्यांचा ऋणी आहे. याशिवाय अनेक ज्ञात-अज्ञात व्यक्तिचे संशोधन कार्य पुर्ण करतांना मला जे सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

ठिकाण - अहमदनगर

K.B. Sonawane

संशोधक

किर्ती भरत सोनवणे

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| 1. | मुखपृष्ठ | 01 |
| 2. | इतिहास संशोधन प्रकल्प अहवाल | 02 |
| 3. | प्रतिज्ञापत्र | 03 |
| 4. | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | 04 |
| 5. | ऋणनिर्देश | 05 |
| 6. | अनुक्रमणिका | 06 |
| 7. | प्रस्ताविका | 07 |
| 8. | शिवालय मंदिर ऐतिहासीक अभ्यास | 08 |
| 9. | गावाचे स्थान | 09 |
| 10. | उद्दिष्टे | 10 |
| 11. | गृहितके | 11 |
| 12. | संशोधन पद्धती | 12 |
| 13. | संशोधनाच्या मर्यादा | 13 |
| 14. | खोपेश्वर मंदिराचा पूर्व इतिहास | 14 |
| 15. | महादेवाचे वाहन नंदी<br>पार्वतीचे वाहन सिंह<br>संकट मोचन हनुमान मंदिर | 15 |
| 16. | पुरातन मंदिर | 16 |
| 17. | आधुनिक मंदिर | 17 |
| 18. | खोपेश्वर मंदिर एक शांततेचे ठिकाण | 18 |
| 19. | मूल्यमापन | 19 |
| 20. | परिशिष्ट | 20-24 |
| 21. | संदर्भ साधने | 25 |

# प्रास्ताविक

संशोधन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे कोणत्याही प्रकारांमध्ये येणाऱ्या इतिहासाची ओळख करून घ्यावयाची झाल्यास संशोधन अतिशय उपयुक्त ठरत असते. प्रकल्प कार्य देखील संशोधनाचे रूप आहे भूतकाळातील घटना या वर्तमान काळाची घडत असलेल्या घटनांना भूतकाळातील घटना कारणीभूत असतात तसेच चालू वर्तमान काळ देखील पुढील भविष्यासाठी उपयुक्त ठरणारा असतो. संशोधनामुळे ह्या घटना समजण्यास होते. भूतकाळ वर्तमान काळ यांचा तुलनात्मक अभ्यास करणे प्रकल्प कार्यामुळे किंवा संशोधनामुळे सोयीस्कर ठरत असते. नगर तालुक्यातील पिंपरी घुमट येथील प्राचीन जागृत देवस्थान खोपेश्वर शिवालय सभोवतालच्या परिसरामधील मंदिरांपैकी हे एक प्रसिद्ध शिवालय आहे. या मंदिराचा इतिहास महत्त्वाचा असून त्याआधारे त्या काळातील शिवालयाच्या वास्तव्याचे भाविकांना दर्शन घडते. याठिकाणी शंकराचे वाहन नंदी याचे विशेष वैशिष्ट्य आहे. या ठिकाणी श्रावण महिन्यात दर सोमवारी भाविकांची दर्शनासाठी गर्दी होते. शेवटच्या सोमवारी महाप्रसादासाठी या मंदिराच्या वतीने हजारो भाविक येत असतात. याठिकाणी महादेव पार्वती यांची जोडीने पिंड आहे आणि संकट मोचन हनुमान मंदिराचा समावेश आहे.

या शोध प्रकल्पामधून ऐतिहासिक जागृत मंदिराचा अभ्यास करण्याचा व या संदर्भातील ऐतिहासिक बाबींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

# प्रकल्पाचा विषय

"श्रीक्षेत्र पिंपरी घुमट (विळद) येथील प्राचीन कालीन जागृत देवस्थान खोपेश्वर शिवालय मंदिर ऐतिहासिक अभ्यास "



# <u>गावाचे स्थान</u>

खोपेश्वर शिवालय
पिंप्री धुमट (पिंपळद)






# उद्दिष्टे

१) विळद पिंपरी येथील प्राचीन जागृत देवस्थान खोपेश्वर मंदिराचा चिकित्सक अभ्यास करणे.

२) संशोधनासाठी मिळालेल्या दुय्यम साधनांची विश्वासार्हता आणि वैधता सिद्ध करणे.

३) विषयाची पद्धतशीर मांडणी करणे, तसेच संकलित तथ्यांचे मूल्यमापन करणे.

४) संकलित तथ्यांचे मूल्यमापन करून निष्कर्ष काढणे.

५) विळद पिंपरी येथील महादेवाच्या प्राचीन मंदिरांचा ऐतिहासिक घडामोडींचा योग्य क्रम लावून सुसंगत वास्तव माहिती सादर करणे.

# गृहीतके

संशोधनामध्ये गृहितके निश्चित केले जातात. या गृहीतकांच्या आधारावरच अभ्यासाची तंत्रे निश्चित केली जातात. ज्ञाना कडून अज्ञानाकडे मूर्त कडून अमुर्ता कडे सर्वसामान्यांकडून विशेशकडे इत्यादी तंत्रज्ञानाचा वापर संशोधनात केला जातो. संशोधनाला दिशा देण्याचे कार्य गृहितके करीत असतात. त्यामुळे गृहीतकाना संशोधनामुळे महत्त्वाचे स्थान आहे.

1. पिंपरी घुमट (विळद) हे एक ऐतिहासिक गाव आहे.
2. या गावात प्राचीन मंदिरे आहेत.
3. खोपेश्वर अर्थात महादेव व पार्वती यांचे मंदिर आहे.
4. या मंदिरामध्ये श्रावण महिन्यात अनेक उत्सव होतात.
5. या मंदिरांमध्ये सिंह आणि महादेवाचे वाहन नंदी यांचे साक्षात दर्शन घडते.
6. एक प्रसिद्ध महादेवाचे मंदिर ऐतिहासिक आहे.

# संशोधन पद्धती

गतकालीन, नवीन जीवनाचा, जीवनपद्धतीचा, सर्वांगीण घडामोडीचा, परिवर्तनाचा, विचार प्रवाहाचा शोध घेणे, हे इतिहास संशोधनाचे उद्दिष्टे ठरते. घडलेल्या घटनांचा शोध घेऊन त्याचा अर्थ लावून त्या घटना क्रमाविषयी यथार्थ मांडणी संशोधनाद्वारे किंवा प्रकल्प कार्य पद्धतीद्वारे केली जाते.

भूतकाळातील या घटना वेगवेगळ्या संदर्भ साधनांच्या सहाय्याने आपल्यासमोर येत असतात. तत्कालीन परिस्थितीची व त्यातील महत्त्वपूर्ण घटकांची माहिती घेण्यासाठी आपल्याला या संदर्भ साधनांचा उपयोग होत असतो. एखाद्या घटनेबाबत, प्रसंगाबाबत अगर विषयासंदर्भात नवीन माहिती तोवर अज्ञात असलेली माहिती मिळवून ती व्यवस्थित रीतीने सर्व वाचकांपुढे मांडणे हा संशोधनाचाच प्रकार होय. संशोधनाचा मूळ उद्देश गतकालीन अज्ञात बाबींवर प्रकाश झोत टाकने, गतकाळा संबंधीच्या ज्ञानात नवीन भर टाकणे, ज्ञानाचे नवीन दालन खुले करणे हा असतो. त्यात नव्या माहितीच्या संशोधनावर व त्याच्या पद्धतशीर सुसंगत मांडणी वर भर असतो.

प्रस्तुत संशोधन प्राचीन जागृत देवस्थान खोपेश्वर शिवालय, पिंपरी घुमट विळद, अहमदनगर येथील मंदिराशी संबंधित असून त्यात अलिखित संशोधन पद्धत तसेच मौखिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. संशोधन साधनांमध्ये धार्मिक, सामाजिक व मौखिक माहितीद्वारे आधार घेतला आहे. संशोधन स्थळाला प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर मंदिरातील पुजारी व इतर भाविक यांची मुलाखत घेऊन त्यातून ही माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

अशा प्रकारे या संशोधनासाठी ऐतिहासिकसंशोधन पद्धती तसेच मुलाखत तंत्राचाही वापर केला गेला आहे.

## संशोधनाच्या मर्यादा

- प्रस्तुत संशोधन हे अहमदनगर जिल्ह्यातील पिंपरी घुमट विळद या जागृत देवस्थाना पुरते मर्यादित आहे.
- पिंपरी घुमट विळद मंदिरांपैकी खोपेश्वर, हनूमान मंदिराशी हे संशोधन संबंधित आहे.
- खोपेश्वर महादेव यांच्या घडामोडीची हे संशोधन संबंधित आहे.
- खोपेश्वर महादेव यांच्या मंदिर व हनुमान मंदिर निगडीत घटनांचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधन प्रकल्पातून करण्यात आला आहे.
- प्रस्तुत संशोधन हे ऐतिहासिक संशोधन आहे.

## खोपेश्वर मंदिराचा पूर्वइतिहास

प्रस्तुत प्रकल्प कार्यामध्ये खोपेश्वर शिवलयाचा पूर्वइतिहास महत्त्वाचा आहे. या शिवमंदिराविषयी पुढील आख्यायिका पुरातन काळापासून सांगितली जात आहे. या ठिकाणी महादेव अर्थात शंकर-पार्वती, कार्तिक व गणेश या कुटुंबासह कैलास नाथ पर्वतावरून गोरक्षनाथ गडावर भंडारा या कार्यक्रमासाठी आले होते. त्यावेळी पिंपरी घुमट येथील डोंगराच्या कुशीतल्या प्रदेशातून जात असताना पार्बती देबींना तहान लागते ब येथे सर्बजण थांबतात. याठिकाणी शंकर महादेव व पार्वती यांनी स्वयंभू जोडीने पिंडीची निर्मिती केली आहे. पुढे या मंदिराचे काम हेमाडपंथी तसेच दगडांमध्ये करण्यात आले आहेत. खोपी म्हणजे एक लहान छोटी जागा होय. या नावापासून या मंदिराला खोपेश्वर असे नाव पडले.

या मंदिराचे भव्य असे बांधकाम होते. मंदिराची सावली दोन किलोमीटर अंतरावर पडत असे. याच काळात मुघल सम्राटाने या मंदिरावर आक्रमण करून मंदिर पाडले. मंदिराच्या दगडांचा वापर भुइकोट किल्लाजवळील चांदबीबीचा महाल या ठिकाणी नेण्यात आले. या खोपेश्वर मंदिराच्या दगडांचे अवशेष या ठिकाणी मिळाले आहेत.

## महादेवाचे वाहन नंदी

- खोपेश्वर अर्थात महादेवाचा अवतार होय. या महादेवाचे वाहन नंदी होय.
- या नंदीचे विशेष वैशिष्ट्य आहे.
- या नंदीच्या कानामध्ये आपली जी इच्छा असेल ती व्यक्त करायची.
- या सर्व गोष्टी आपल्या खऱ्या अर्थाने सर्व भाविकांना अनुभव मिळतो.

## पार्वतीचे वाहन सिंह

- शंकराची पत्नी पार्वती जोडीने गोरक्षनाथ या गडावरील प्रवास करताना त्या ठिकाणी त्यांना तहान लागते म्हणून ते विश्रांती घेतात.
- त्यांच्याबरोबर सिंह वाहन असते.

## संकट मोचक हनुमान मंदिर

- याठिकाणी खोपेश्वर मंदिरा भोवती हनुमान मंदिर आहे.
- या मंदिरामध्ये अनेक भाविक दर्शन घेतात.
- संकटमोचक म्हणजेच ज्यावेळेस संकट येते त्यावेळेस हनुमान अर्थात मारुती धावून येतात.
- सर्वांचे मारुती रक्षण करतात.

## *. पुरातन मंदिर खोपेश्वर शिवालय

- अहमदनगर शहरापासून 12 किलोमीटर अंतरावर पिंपरी घुमट विळद येथे पुरातन मंदिर बांधलेले आहे.
- याठिकाणी मोठ्या प्रमाणात दगडी बांधकाम आहे.
- मंदिर परिसरामध्ये अनेक झाडेझुडपे, डोंगर, तलाव इत्यादींचा समावेश आहे.
- महादेवाचे मंदिर अहमदनगर शहरापासून पिंपरी घुमट याठिकाणी आज लाखो भाविकांचे श्रद्धा स्थान बनलेले आहे.
- पुरातन मंदिराला चांदबीबी महालासाठी मुघल शासनाने या मंदिरावर आक्रमण करून ते पाडले.
- या मंदिराच्या दगडांचा वापर अहमदनगर येथील चांदबीबी महाल याठिकाणी करण्यात आला आहे.

# आधुनिक मंदिर खोपेश्वर शिवालय

- सध्याचे बांधकाम हे विट वाळू सिमेंट तसेच कॉंक्रीटमध्ये बांधण्यात आले आहे.
- या मंदिराभोवती अनेक बांधकाम तसेच छोटे तलाव व जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी हौद बांधण्यात आला आहे.
- या परिसरामध्ये लहान-मोठे झाडे पण आहेत, तसेच पिंपळ, वड, उंबर, पळस, बेल इत्यादी झाडे आहेत.
- महादेवाला बेलाच्या झाडाचे फुल पाने वाहतात.

## खोपेश्वर मंदिर एक शांततेचे ठिकाण

- या खोपेश्वर मंदिराला भेट दिल्यावर आत्म्याला शांती मिळते.
- याठिकाणी झाडेझुडपे, पशुपक्षी, जनावरे यांचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे.
- याठिकाणी कोणतीही गर्दी, गोंगाट, तसेच अन्य घटकांचा परिणाम नाही.
- या ठिकाणावरील हवा, पानी, वातावरण चांगल्या प्रकारचा आहे.

# मूल्यमापन

अशा प्रकारे पिंपरी घुमत येथील खोपेश्वर शिवालय मंदिराविषयी प्रकल्प कार्य पूर्ण केले आहे. या प्रकल्पाद्वारे पिंपरी घुमट (विळद) येथील जागृत देवस्थान खोपेश्वर शिवालय मंदिराच्या निर्मितीविषयी सखोल माहिती समाजातील संशोधकांना उपयोगी पडेल अशा रीतीने बांधण्याचा प्रयत्न केला आहे.

परिशिष्ट व संदर्भसूची याचा उपयोग अन्य इतिहास, अभ्यासक व विद्यार्थी तसेच संशोधक यांना उपयुक्त ठरले. या प्रकल्पाद्वारे प्राचीन जागृत देवस्थान खोपेश्वर शिवालय मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

# परिशिष्टे



महादेवाचे वाहन - नंदी

पार्वतीचे वाहन - सिंह




प्राचीन कालीन खोपेश्वर शिवालय महादेवाची स्वयंभू पिंड पिंपरी घुमट

विळद अहमदनगर






<u>खोपेश्वर मंदिर एक निसर्ग रम्य तसेच शांततेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे.</u>



या परिसरामध्ये हजारो जनावरांचा मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे



या मध्ये विशेष करून जून ते ऑक्टोबर या काळात मोठ्या प्रमाणात घोडे तसेच पशु पक्षी जंगलातील प्राणी यांचे निसर्ग रम्य वातावरणात वास्तव्य असते




हनुमान मंदिर प्रवेश द्वार



संकट मोचक हनुमान मंदिर, पिंपरी घुमट (विळद)

## संदर्भ साधने


१) इतिहास म्हणजे काय प्रा. इ. एच. कार

२) इतिहासाची तोंडओळख प्रा. अरुणा मोरे, प्रा. राजेंद्र भांगरे, प्रा. चव्हाण

३) इतिहास एक शास्त्र - प्रा. देव प्रभाकर

४) गुगल विकिपीडिया

५) मंदिराचे पुजारी रभाजी सिंधू चंद

६) मंदिराचे पुजारी लहानु होडगर

७) स. ग. मालसे. शोधनिबंधाची लेखन पद्धती

८) लोकवाङ:मय गृह, मुबंई

९) प्रा. कल्याण चव्हाण, उपयोजित इतिहास, निराली प्रकाशन

JANTA SHIKSHAN PRASARAK MANDAL'S

**MARUTRAOJI GHULE PATIL ARTS, COM. & SCI. COLLEGE, AHMEDNAGAR**



**Subject Wise Register (Single Subject) [For A.Y. 2021-2022]**

**Class:** T.Y.B.A (CBCS) **Medium:** (All) **Division Type:** G/NG/PNG **Division:** (All)

**Gender:** (All) **Subject:** Aplied History **Subject Code:** DSE-3C(

| Member ID | Roll No. | Eligibility No. | Student's Name | Mother's Name | Gender | Caste Category | Fee Category | Adm. Date | Div. | Cell No. | Last Exam % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3014 | 7 | 12019098778 | KAMBLE SAMIKSHA DATTATRAY • | SHILPA | Female | ST | SCHOLARSHIP | 16/11/2021 | A | 9096784152 | 57.54 |
| 3163 | 8 | 12019098799 | SONAWANE KIRTI BHARAT • | SUREKHA | Female | OPEN | PAYING | 16/11/2021 | A | 9730897426 | 59.08 |
| 3163 | 8 | 12019098799 | SONAWANE KIRTI BHARAT • | SUREKHA | Female | OPEN | PAYING | 16/11/2021 | A | 9730897426 | 59.08 |
| 2742 | 14 | 12018403552 | JADHAV RAHUL BHAGWAN • | VANDANA | Male | SC | SCHOLARSHIP | 19/11/2021 | A | 9922345396 | 55.54 |
| 3121 | 31 | 12019098849 | KARADKAR SHAMAL DATTATRAY | JANABAI | Female | OBC | SCHOLARSHIP | 29/11/2021 | A | 9822219487 | 54.46 |
| 3259 | 35 | 12019096822 | RUSHIKESH RAJENDRA AVHAD | PUSHPLATA | Male | OBC | SCHOLARSHIP | 06/12/2021 | A | 8180072433 | 54.15 |
| 1478 | 42 | 12014272262 | SHINDE ARCHANA SUDHAKAR • | SANDHAY | Female | SC | SCHOLARSHIP | 19/01/2022 | A | 9175630379 | 54.00 |
| 2634 | 44 | 12018403502 | SATPUTE JAGADISH MACHHINDRA | MANDA | Male | OBC | SCHOLARSHIP | 30/12/2021 | A | 8788541490 | 49.33 |

Total 8 records

Caste Category Summary Report

| Caste Category | Male | Female | Total |
|---|---|---|---|
| OBC | 2 | 1 | 3 |
| OPEN | 0 | 2 | 2 |
| SC | 1 | 1 | 2 |
| ST | 0 | 1 | 1 |
| Total | 3 | 5 | 8 |

Fee Category Summary Report

| Fee Category | Male | Female | Total |
|---|---|---|---|
| PAYING | 0 | 2 | 2 |
| SCHOLARSHIP | 3 | 3 | 6 |
| | 3 | 5 | 8 |

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# मारुतरावजी घुले पाटील कला वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर.

## इतिहास विभाग

**T.Y.B.A. प्रकल्प कार्य व मौखिक परीक्षा**

**◆ शैक्षणिक वर्ष : २०२१-२२**

**Applied History S-3 (उपयोजित इतिहास) सेमिस्टर-6**

| अ. नं. | विद्यार्थी नाव | सही |
|---|---|---|
| १) | कांबळे समीक्षा दत्तात्रय | S.D.Kamble |
| २) | सोनवणे कीर्ती भारत | K.B.Sonawane |
| ३) | जाधव राहुल भगवान | [signature] |
| ४) | कराडकर शामल दत्तात्रय | S.d.Karadkar |
| ५) | ऋषिकेश राजेंद्र आव्हाड | R.S.Ahad |
| ६) | शिंदे अर्चना सुधाकर | Shinde A.S. |
| ७) | सातपुते जगदीश मच्छिंद्र | [signature] |

Department of History
Marutraoji Ghule Patil Arts, Commerce
& Science College, Ahmednagar

प्राचार्य
मारुतरावजी घुले पाटील
कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय
नागापुर, अहमदनगर

पुण्य नगरी

# घुले पाटील महाविद्यालयाची गड-किल्ले संवर्धन मोहीम

**एरंडगाव:** अहमदनगर येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, इतिहास विभाग व भूगोल विभाग अंतर्गत गड-किल्ले संवर्धन व स्वच्छता अंतर्गत प्रकल्प क्षेत्र भेटींचे आयोजन करण्यात आले होते.

क्षेत्रभेटीमध्ये विद्यार्थ्यांनी दौलत मंगळगड (भुलेश्वर), किल्ले पुरंदर, नारायणपूर, प्रतिबालाजी, जेजुरी गड, मोरगाव गणपती आदी ठिकाणी भेटी देऊन स्वच्छता करण्यात आली. मोहिमेमध्ये दौलत मंगळगड येथील प्राचीन पांडवकालीन भुलेश्वर हेमाडपंथी शिवमंदिराच्या आतील बाजूस रामायण-महाभारतातील युद्धप्रसंग, द्रौपदी-स्वयंवर, शरपंजरी भीष्म, हत्तीला आकाशात फेकणारा भीम, ही कथाशिल्पे अधिक जिवंत वाटतात. मातृकादेवी, गणपती, विष्णूंचे अवतार, योद्धे, पक्षी, आदी विविध प्रकारचे शिल्पांकन मंदिरात कोरले आहेत. मकर संक्रांतीच्या दिवशी मंदिरातील शिवपिंडीवर सूर्यकिरण पडतात, त्यामुळे या मंदिराचे आकर्षण सर्वांनाच वाटते. विद्यार्थ्यांनी किल्ले पुरंदर येथे मुरारबाजी यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या जन्मस्थळाला भेट दिली. या गडावर घडलेले अनेक प्रसंग, मराठ्यांनी फत्तेखानाशी दिलेली झुंज, या लढाईत मराठ्यांना मोठे यश मिळाले. वज्रगडावरून होणारे तोफांचे हल्ले, माचीवर खानाचे आणि मुरारबाजीचे घनघोर युद्ध, पुरंदरचा तह, अशा ऐतिहासिक स्थळांविषयी इतिहास विभागप्रमुख प्रा. एस. व्ही. मरकड यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. श्रीक्षेत्र नारायणपूर येथील दत्त मंदिर, केतकवळे येथील प्रतिबालाजी मंदिर, महाराष्ट्राचे आराध्य दैवत जेजुरी गड येथे विद्यार्थ्यांनी भंडाऱ्याची उधळण करून खंडेरायाचे दर्शन घेतले. मोरगावच्या मयुरेश्वराचे दर्शन घेऊन या धार्मिक स्थळाविषयी विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. के. आर. पिसाळ यांनी विद्यार्थ्यांना गड-किल्ले व धार्मिक स्थळे संवर्धन व स्वच्छतेबद्दल संदेश देऊन त्यांच्यामध्ये संवर्धन व स्वच्छतेची जाणीव निर्माण केली. भूगोल विभागप्रमुख प्रा.एम. एल. कराळे यांनी विद्यार्थ्यांना कात्रज घाट, दिवे घाट, डोंगर रांगेवरील पुरंदर, वज्रगड, दौलत मंगळगड भौगोलिक क्षेत्राबद्दल माहिती दिली. या मोहिमेसाठी प्रा.डॉ. के. आर. पिसाळ प्रा. एस.व्ही.मरकड, प्रा. एम.एल.कराळे, प्रा. एम.बी.आढाव, आर.आर. ताकपेरे तसेच भाग्यश्री राख, रोहित प्रभूने, ओमकार वारे, निकिता तांगडे, विशाखा ससे, अर्चना शिंदे, समीक्षा कांबळे, महेश आमले, उमेश ठोंबरे, प्रतिभा टेकुळे, अंकित केदारी, संकेत निमसे,सिद्धार्थ करंडे, रुक्मिणी उगलमुगले, प्रकाश बाचकर, शिवम ढगे या स्वयंसेवकांसह विद्यार्थ्यांनी गड-किल्ले स्वच्छतेमध्ये सहभाग घेऊन स्वच्छतेचा संदेश दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए. के. पंदरकर व संस्था विश्वस्त डॉ. क्षितीज घुले यांनी या क्षेत्रभेटीबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



(छाया : प्रविण खोमणे)


GPS Map Came
भूलेश्वर नगर, महाराष्ट्र, भारत
C6PR+9GQ, भूलेश्वर नगर, महाराष्ट्र 412104, भारत
Lat 18.435749°
Long 74.241467°
28/04/22 10:29 AM
Google






FRIENDS

# घुले पाटील महाविद्यालयाचा ऐतिहासिक शैक्षणिक दौरा पूर्ण

## गडकिल्ले संवर्धन, स्वच्छता , क्षेत्र भेटीस विद्यार्थी, प्राध्यापकांचा प्रतिसाद






जनभूमी नगर : प्रतिनिधी

----------

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे, मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर येथील राष्ट्रीय सेवा योजना,इतिहास विभाग व भूगोल विभाग अंतर्गत गड-किल्ले संवर्धन व स्वच्छता मोहीम अंतर्गत प्रकल्प क्षेत्र भेट उपक्रम घेण्यात आला.या क्षेत्रभेटी मध्ये विद्यार्थ्यांनी दौलत मंगळगड (भुलेश्वर),किल्ले पुरंदर, नारायणपूर, प्रतिबालाजी, जेजुरीगड,मोरगाव गणपती आदी ठिकाणी भेट देऊन स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेमध्ये दौलत मंगळगड येथील प्राचीन पांडवकालीन भुलेश्वर हेमाडपंथी शिवमंदिर आहे.या मंदिराच्या आतील बाजूस रामायण-महाभारतातील युद्धप्रसंग,द्रौपदी-स्वयंवर, शरपंजरी भीष्म, हत्तीला आकाशात फेकणारा भीम ही कथाशिल्पे अधिक जिवंत वाटतात. मातृकादेवी, गणपती, विष्णूंचे अवतार, योद्धे,पक्षी इत्यादी विविध प्रकारचे शिल्पांकन मंदिरात कोरले आहेत. तसेच मुख्य द्वारावरती सुंदर नक्षीकाम व भव्य नंदी यामुळे मंदिराच्या सौंदर्यात भर पडली आहे.मकर संक्रांतीच्या दिवशी मंदिरातील शिवपिंडीवर सूर्यकिरण थेट जाऊन पडते त्यामुळे या मंदिराचे आकर्षण सर्वांनाच वाटते. या बरोबरच विद्यार्थ्यांनी किल्ले पुरंदर येथे मुरारबाजी यांच्या पराक्रमाचे स्मरण करून त्यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.तसेच छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मस्थळाला भेट दिली. या गडावर घडलेले अनेक प्रसंग, मराठ्यांनी फत्तेखानाशी दिलेली झुंज या लढाईत मराठ्यांना मोठे यश मिळाले.वज्रगडावरून होणारे तोफांचे हल्ले,माचीवर खानाचे आणि मुरारबाजीचे घनघोर युद्ध, पुरंदरचा तह अशी ऐतिहासिक स्थळाविषयी इतिहास विभाग प्रमुख प्रा.एस. व्ही.मरकड यांनी ऐतिहासिक दाखले देत विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच धार्मिक पर्यटनाच्या माध्यमातून श्री. क्षेत्र नारायणपूर येथील दत्त मंदिर, केतकवळे येथील प्रतिबालाजी मंदिर,महाराष्ट्राचे आराध्य दैवत जेजुरी गड येथे विद्यार्थ्यांनी भंडाऱ्याची उधळण करून येळकोट येळकोट जय मल्हार जयघोष करून खंडेरायाचे दर्शन घेतले.तसेच या क्षेत्रभेटीच्या अष्टविनायकातील मोरगावच्या मयुरेश्वराचे दर्शन अखेर घेऊन या धार्मिक स्थळाविषयी विद्यार्थ्यांनी माहिती घेतली.यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. के. आर.पिसाळ यांनी विद्यार्थ्यांना गड-किल्ले व धार्मिक स्थळे संवर्धन व स्वच्छतेबद्दल संदेश देऊन त्यांच्यामध्ये संवर्धनाची व स्वच्छतेची जाणीव निर्माण केली.आपल्या ऐतिहासिक स्थळांची जपवणूक करताना गड- कोटांवर नावे लिहू नयेत.तसेच अनेक पर्यटक पाण्याच्या प्लास्टिक बाटल्या, खाद्यपदार्थ, प्लास्टिक,रद्दी आदी वस्तू गडावर टाकून गडकोटांच्या सौंदर्यात हानी पोहोचवतात.तसेच गडावरील दगड,माती,जुन्या वस्तू,मुर्ती विद्रुप करतात अथवा घेऊन जातात.या संदर्भात आपण सर्वांनी जागरूक राहने गरजेचे आहे.आपला ऐतिहासिक वारसा व स्थळे ही पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरतील यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.तसेच भूगोल विभाग प्रमुख प्रा.एम.एल.कराळे यांनी विद्यार्थ्यांना या पर्यटनाविषयी कात्रज घाट,दिवे घाट,डोंगर रांगेवरील पुरंदर,वज्रगड,दौलत मंगळगड भौगोलिक क्षेत्राबद्दल माहिती दिली.महाविद्यालयाच्या अभ्यास पूर्ण गड-किल्ले संवर्धन व स्वच्छता शैक्षणिक दौरा यशस्वितेसाठी प्रा.डॉ.के.आर. पिसाळ प्रा.एस. व्ही.मरकड,प्रा.एम.एल.कराळे प्राध्यापिका एम.बी.आढाव,श्री. आर.आर. ताकपेरे तसेच भाग्यश्री राख,रोहित प्रभूने,ओमकार वारे,निकिता तांगडे, विशाखा ससे, अर्चना शिंदे,समीक्षा कांबळे, महेश आमले,उमेश ठोंबरे,प्रतिभा टेकुळे,अंकित केदारी,संकेत निमसे,सिद्धार्थ करंडे,रुक्मिणी उगलमुगले,प्रकाश बाचकर, शिवम ढगे स्वयंसेवक विद्यार्थ्यांसह आदी विद्यार्थ्यांनी गड-किल्ले स्वच्छतेमध्ये सहभाग घेऊन स्वच्छतेचा संदेश दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.के. पंदरकर व संस्था विश्वस्त डॉ.क्षितिज घुले यांनी या क्षेत्रभेटी बद्दल सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.